ISSN - No. 2319-9318

*Peer Reviewed International Research Journal*

UGC Approved

# VIDYAWARTA

## *Special Issue.*

Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's

# Arts,Commerce and Science College, Ashti

Tal.Ashti, Dist.Beed (MS)

Accredited by NAAC B++ Grade with 2.78 CGPA, ISO 9001:2015, Green Audited College

**Interdisciplinary National Conference on**

## Recent Trends in Social Sciences & Commerce



27th February 2018

# PUBLIC ADMINISTRATION & POLITICAL SCIENCE

Organizer
Dr. S. R. Nimbore
Principal

| | | | |
|---|---|---|---|
| 48 | Panchayat Raj Institution in India | Dr. Jayram S. Dhawale | 160 |
| 49 | Women And Panchyat Raj Institution | Dr. Suhas R. Morale<br>Mr. Pakkapon Jantaraoj | 164 |
| 50 | Political Development and Modernization | Dr. Vinod V. Bairagi | 167 |
| 51 | Indian's foreign policy and diplomacy with Different Countries for National Interest | Shaikh Gafoor Ahmed | 180 |
| 52 | Women Empowerment | Ranee Jagannathrao Jadhav | 185 |
| 53 | Human Right and Type | Shivaji Gorakshanath Dhokane | 188 |
| 54 | Human Rights in Indian Constitution | Dr. R. K. Kale | 192 |
| 55 | Marginal Status Of Women And Need Of Empowerment - A Review | Prof AnujaA.Kastikar<br>Dr. SangeetaS.Sasane198 | 196 |
| 56 | Womens Human Rights & Women Empowerment | Dr. S.N. Satale | 199 |
| 57 | भारतीय राज्यघटना आणी मानवी हक्क | प्रा.डॉ गालफाडे ए.बी. | 202 |
| 58 | मानवी हक्क आणि जागतीक शांतता | प्रा. डॉ. ढोबळे डी. बी. | 205 |
| 59 | पंडित नेहरूंचे अण्वस्त्र धोरण | प्रा.डॉ.माधव कदम | 208 |
| 60 | महिला सबलीकरणामध्ये प्रशासनाची भूमिका | डॉ. नामानंद गौतम साठे | 214 |
| 61 | जी एस टी (वस्तु व सेवा कर) आणि राज्या समोरील अव्हाने | डॉ.साहेब साठोड<br>गणेश मारोती कचरे | 217 |
| 62 | मानवी हक्क व नैतिकता | प्रा. डॉ. अनिल दत्तू देशमुख | 219 |
| 63 | पंचायतराज व्यवस्था आणि ग्रामपंचायतीतील महिला आरक्षण | काळे आर.के. | 222 |
| 64 | विविध क्षेत्रांतर्गत महिलांचे सबलीकरण | प्रा. सतिश मैलारी कटके | 226 |
| 65 | मानवी हक्कांची समीक्षा | डॉ. खडके ज्ञानेश्वर सुखदेव | 231 |
| 66 | मानवी हक्क : स्वरुप व स्वयंसेवी संस्था | प्रा. डॉ. महेश मोटे | 233 |
| 67 | महिला सबलीकरण | प्रा. डॉ. शिवाजी गोविंदराव दिवाण | 238 |
| 68 | मानव अधिकार आणि भारताची भूमिका | प्रा.डॉ.मुंडे एम.आर. | 241 |
| 69 | भारतातील पंचायतराज पद्धत | प्रा.डॉ. पोकळे के.जी. | 244 |
| 70 | शितयुध्दोत्तर काळात भारताचे परराष्ट्र धोरण | प्रा.डॉ. रामकिशन लोमटे | 248 |
| 71 | मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना | प्रा.ज्ञानेश्वर बनसोडे डॉ. महादेव गव्हाणे | 251 |
| 72 | मानवी हक्क व मानवी हक्काची पायमल्ली करणारे घटक | प्रा.डॉ.रजनी अ. बोरोळे | 254 |


71

# पंचायतराज व्यवस्था आणि ग्रामपंचायतीतील महिला आरक्षण

काळे आर.के.
राज्यशास्त्र विभाग,
अंकुशराव टोपे महाविद्यालय,
जालना

**प्रस्तावना :**

भारताने लोकशाही शासनव्यवस्थेचा स्विकार केला आहे. लोकशाही शासन व्यवस्था ही विकेंद्रीकरणावर आधारीत आहे. लोकशाही विकेंद्रीकरण आणि पंचायतराज हे दोन घटक एक दुसऱ्यावर अवलंबून असतात. दुसऱ्या महायुध्दानंतर आशिया आणि आफ्रिका खंडातील नवोदित राष्ट्रांनी लोकशाही शासन व्यवस्था मजबूत करण्यासाठी आणि सामान्य जनतेला राजकारणात सहभागी करुन घेण्यासाठी लोकशाही विकेंद्रीकरणाचा प्रयोग सुरू केला. या प्रयोगास 'ग्रास रूट डेमोक्रसी' असे नावही देण्यात आले. म्हणूनच लोकशाहीला पृथ्वीतलावर अतिशय महत्व प्राप्त झाले. अशा या लोकशाहीचा अर्थ राजकीय व्यवस्था होय आणि ही राजकीय व्यवस्था केवळ राष्ट्रीय आणि राज्यपातळीवर मर्यादीत न ठेवता ती शेवटच्या स्तरापर्यंत पोहचली पाहिजे यालाच लोकशाही विकेंद्रीकरण म्हणतात. या लोकशाही विकेंद्रीकरणाचे माध्यम हे पंचायतराज व्यवस्था आहे. हिच पंचायतराज व्यवस्था शासनाला सामान्य लोकांच्या दरवाज्यापर्यंत आणण्याचे काम करत असते. म्हणूनच शासन या पंचायतराज व्यवस्थेकडे जास्तीत जास्त लक्ष देण्याचा प्रयत्न करत आहे.

या पंचायतराज व्यवस्थेमुळे स्थानिक लोकांमध्ये स्थानिक कार्य करण्याची आवड निर्माण होत असते कारण आपल्या स्थानिक समस्या स्थानिक स्तरावर निरसन करण्याचे कामही याच व्यवस्थेच्या माध्यमातून होत असते. म्हणूनच या पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून शासन लोकांना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सत्तेत सहभागी करुन घेण्याचा प्रयत्न करत असते. खरे तर पंचायतराज व्यवस्था ही भारतास नवीन नाही. भारतात अगदी प्राचीन काळापासून अशा प्रकारच्या पंचायतराज व्यवस्थेतील संस्था कार्यरत होत्या. या संस्थांना फार मोठा इतिहास लाभला आहे. म्हणजे त्यांचे अस्तित्व दिर्घकाळ टिकून राहिले होते आणि भारतीय समाज एकत्र ठेवण्यात तसेच त्यांच्या काही महत्वाच्या गरजांची पूर्तता करण्यात त्यांनी महत्वपूर्ण भूमिका बजाविली होती. म्हणून भारत स्वतंत्र झाल्यानंतर जी घटना लिहिली त्या भारतीय राज्यघटनेत 'स्थानिक स्वराज्य संस्था' किंवा 'स्थानिक शासनसंस्था' या विषयाचा समावेश राज्यसूचीमध्ये करण्यात आला.

राज्यघटनेने या संबंधीचा अधिकार घटक राज्यांना देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानुसार घटक राज्यांना प्राप्त झालेल्या या अधिकाराप्रमाणे त्यांनी ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांची जी विशिष्ट व्यवस्था प्रस्थापित केली आहे त्या व्यवस्थेलाच 'पंचायतराज' असे म्हटले जाते.२ ही पंचायतराज व्यवस्था ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांची विशिष्ट अशी व्यवस्था आहे. या व्यवस्थेच्या माध्यमातून भारत सरकारने लोकशाही विकेंद्रीकरणाच्या धोरणाचा पाठपुरावा करण्याचे धोरण ठरवून त्यासाठी १९५४ मध्ये पंचायतराज व्यवस्था स्थापन करण्याबाबत विचार करण्यासाठी एका समितीची स्थापना केली. या समितीने ग्रामपंचायतींची स्थापना करण्यास आणि त्यांना व्यापक अधिकार देण्याची शिफारस केल्यामुळे शासनाने लोकशाही विकेंद्रीकरणाच्या तत्वास मान्यता दिली. खरे तर भारताचे केंद्र सरकार सुरुवातीपासूनच विकेंद्रीकरणास अनुकूल होते त्यानंतर मेहता समितीच्या शिफारशींमुळे या विकेंद्रीकरणासारख्या प्रश्नाला अधिकच चालना मिळाली.

बलवंतराय मेहता समितीने लोकशाही विकेंद्रीकरणाची जी त्रिस्तरीय व्यवस्था सुचविली होती त्याच व्यवस्थेला 'पंचायतराज' असे संबोधले जाऊ लागले. लोकशाही विकेंद्रीकरणाचा किंवा पंचायतराज व्यवस्थेचा स्विकार करणारे राजस्थान हे भारतातील पहिले राज्य ठरले गेले. राजस्थान या घटक राज्याने १९५९ मध्ये पंचायतराज्य व्यवस्थेचा शुभारंभ केल्यानंतर आंध्रप्रदेश, ओरिसा, उत्तर प्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्र इत्यादी घटकराज्यांनीही त्यांचा स्विकार केला. महाराष्ट्र हे पंचायतराज व्यवस्थेचा स्विकार करणारे देशातील नववे राज्य आहे.

पंचायतराज व्यवस्थेमुळे ग्रामीण समाजातील सर्वसामान्य लोकांना राजकीय सत्तेत सहभागी होण्याची प्रथमच संधी मिळाली. ग्रामीण समाजात स्थानिक पातळीवर नवे नेतृत्व उदयास आले. या नेतृत्वाने विकास कार्यात पुढाकार घेतला. तसेच पंचायतराज संस्थांमुळे ग्रामीण समाजात नवी सत्तास्थाने निर्माण झाली. ही सत्तास्थाने काबीज करण्यासाठी स्थानिक पातळीवरील अनेक कार्यकर्ते पुढे आले. आपल्या अंगचे नेतृत्वगुण प्रकट करित त्यांनी ग्रामीण भागाच्या राजकारणावर आपली जबरदस्त पकड बसविली. त्याच्याही पुढे जाऊन संपूर्ण राज्याच्या राजकारणावर या नव्या नेतृत्वाने आपला प्रभाव पाडण्यास सुरुवात केली. म्हणून

 ISSN – 2319 9318

ग्रामीण समाजाच्या विकासकार्यात स्थानिक जनतेला सहभागी करुन घेण्याचा राज्याचा उद्देश बऱ्याच अंशी सफल झाला आहे असे म्हणता येईल.

पंचायत राज्याच्या स्थापनेमुळे ग्रामीण भागात उत्साह संचारला. ग्रामीण जनतेत राजकीय जागृती घडून आली. परंतू त्यांच्या जोडीने ग्रामीण समाजात नव्या सत्ता संघर्षालाही तोंड फुटले. सत्ता स्पर्धेच्या माध्यमातून सत्ता संघर्ष सुरु झाला. सत्ता काबीज करण्यासाठी कोणत्याही बऱ्या वाईट गोष्टीचा आधार घेण्याची प्रवृत्ती ग्रामीण नेतृत्वाच्या ठिकाणी प्रकर्षाने दिसू लागली. त्यातूनच जाती पातीच्या राजकारणाला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळाले. तसेच ग्रामीण समाजातील उच्च जातींनी आपल्या संख्या बळाच्या आणि आर्थिक शक्तीच्या जोरावर पंचायतराज संस्थांमध्ये प्रमुख सत्तास्थाने काबीज केली. या सगळ्या गोष्टीवर उपाय म्हणून भारत सरकारने १९९३ मध्ये ७३वी घटनादुरुस्ती केली याला अनुसरुन महाराष्ट्र शासनानेही आपल्या महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ आणि मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ या अधिनियमात अनेक महत्वाचे बदल केले. या कायद्यान्वये अनुसूचित जाती व जमातींच्या लोकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात पंचायतराज संस्थांमध्ये राखीव जागा ठेवण्याची व्यवस्था सुरुवातीपासूनच होती. परंतू १९९४ मध्ये नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गाला २७ टक्के आरक्षण ठेवण्याची तरतूद करण्यात आली. तसेच सर्वच प्रवर्गातील स्त्रियांसाठी ३३ टक्के राखीव जागा ठेवण्याची तरतूदही करण्यात आली.३ या आरक्षणाबाबतच्या तरतूदींमुळे दुर्बल किंवा उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देण्याच्या सरकारच्या प्रयत्नातील आणखी एक महत्वाचा टप्पा गाठला आहे. अनुसूचित जाती, जमाती, मागास प्रवर्ग व स्त्रिया हे सर्व भारतीय समाजातील दुर्बल घटक आहेत. अशा या दुर्बल घटकांना इतर वर्गाच्या बरोबरीने आणण्याचा हा प्रयत्न सरकारने पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून करण्याचा हा जो प्रयत्न आहे तो अतिशय महत्वाचा आहे. तसेच या पंचायतराज व्यवस्थेतील आरक्षणासंबंधीत आणखी एक महत्वाची तरतूद अशी की, पंचायतराज संस्थामधील सरपंच, पंचायतसमितीचा सभापती आणि जिल्हा परिषदेचा अध्यक्ष या अधिकार पदासाठीही वरील घटकांना आरक्षण लागू केले आहे. त्यामुळे पंचायतराज संस्थांमधील महत्वाच्या पदावर जाण्याची संधी या घटकातील लोकांना मोठ्या प्रमाणावर मिळाली आहे. आतापर्यंत वरील अधिकारपदाबाबत काही विशिष्ट वर्गाच्या लोकांची मक्तेदारी झाल्याचे दिसत होते परंतू आरक्षणासंबंधीच्या नव्या तरतुदींमुळे त्यांची मक्तेदारी आता मोडीत निघाली आहे. तसेच महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये सहभाग वाढावा म्हणून केंद्र सरकारने २०११ मध्ये संसदेत ११०वे घटनादुरूस्ती विधेयक मांडले. राज्यघटनेच्या कलम २४३ (डी) अन्वये पंचायतराज व्यवस्थेत महिलांना ५० टक्के आरक्षण देण्यासंदर्भात यात तरतुद करण्यात आली. हे विधेयक लोकसभेत मंजूरही झाले परंतु संसदेच्या स्थायी समितीकडे ते सविस्तर अभ्यासासाठी पाठविल्यामुळे ते प्रलंबित आहे.

यापुढेही जाऊन महाराष्ट्र राज्याचे ८ मार्च २०११ला महिला दिनाला १०० वर्षे पूर्ण झाली. या शतकपुर्तीच्या निमित्ताने जगभरातील महिलांनी विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन आनंदोत्सव साजरा केला. भारतातील महिलांनी सुध्दा विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या दिवसाच्या अनुषंगाने जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजे ७ मार्च २०११ रोजी मुंबईमधील दादरस्थित टिळक भवनात काँग्रेसच्या महिला प्रदेश आघाडीने मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी राज्यातील महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षणाची घोषणा केली. या घोषणेमुळे सध्या असणाऱ्या ३३ टक्के आरक्षणात १७ टक्क्याची वाढ होऊन ५० टक्के झाले आहे. मंत्रीमंडळाची व विधिमंडळाची या विधेयकाला मान्यता मिळाली आहे. या निर्णयामुळे ग्रामपंचायत, पंचायतसमिती, जिल्हापरिषद, नगरपालिका व महानगरपालिका निवडणूकीमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण मिळाले आहे. त्यामुळे राज्यातील २७,६०९ ग्रामपंचायतींपैकी या आरक्षणामुळे ५० टक्के म्हणजेच १३,८०४ महिला सरपंच आहेत. ३९२२ पंचायत समिती सदस्यांपैकी १९६१ महिला सदस्य तर जिल्हापरिषदेमध्ये १९६१ सदस्यांपैकी ९८० महिला सदस्य आहेत. १५ महानगरपालिकामध्येही निम्म्या महिला आहेत. या निर्णयामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेचे चित्रच बदलले आहे.

**ग्रामपंचायतः**

महाराष्ट्रातील पंचायतराज्याच्या त्रिस्तरीय व्यवस्थेमधील तिसऱ्या स्तरावर म्हणजे ग्रामपातळीवर कार्य करणारी संस्था म्हणजे ग्रामपंचायत होय. या ग्रामपंचायतीची निर्मिती मात्र जिल्हा परिषद व पंचायत समिती या दोन घटकापेक्षा वेगळ्या पद्धतीने झाली आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती या दोन संस्थाची स्थापना 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ यानुसार करण्यात आली आहे. परंतू ग्रामपंचायत ही पंचायतराज्याचा एक घटक असली तरी वरिल अधिनियम अस्तित्वात येण्यापुर्वीपासूनच महाराष्ट्रात ग्रामपंचायती कार्यरत होत्या. महाराष्ट्रात किंवा पुर्वीच्या मुंबई प्रांतात ग्रामपंचायतीची स्थापना ब्रिटीश सत्तेच्या काळातच झाली होती त्यानंतर मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ या कायद्याने ग्रामपंचायतींना अधिक स्पष्ट व सुसंघटीत स्वरुप दिले. राज्यातील ग्रामपंचायतीचा कारभार याच कायद्यान्वये चालविला जात आहे. पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर सन

| अ.क्र | जिल्ह्याचे नाव | पुरूष सरपंचाची संख्या | महिला सरपंचाची संख्या | एकूण सरपंचाची संख्या |
|---|---|---|---|---|
| ३४ | चंद्रपूर | ४२४ | ४२४ | ८४८ |
| ३५ | गडचिरोली | २१९ | २१८ | ४३७ |
| | एकूण | १३८१५ | १३८०४ | २७६०९ |

Source: www.panchayatraj.gov, year 2011

या निर्णयामुळे ग्रामपंचायत, पंचायतसमिती, जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महानगरपालिका यांच्या निवडणूकीमध्ये महिलांना ५०% आरक्षण मिळाले. सध्या राज्यात २७,६०९ सरपंच आहेत. या विधेयकामुळे किंवा आरक्षणामुळे ५०% म्हणजेच १३,८०४ महिला सरपंच आहेत. तसेच ३९२२ पंचायत समिती सदस्यांपैकी ११६१ महिला सदस्य आहेत आणि जिल्हा परिषदेत ११६१ सदस्यांपैकी ९८० महिला सदस्य आहेत. तसेच नगरपालिका व महानगरपालिकामध्येही निम्म्या महिला राहणार आहेत. या निर्णयामुळे महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्थेचे चित्र बदलेले आढळून येते.

## निष्कर्ष

७३ व्या घटनादुरूस्तीमुळे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेत अमूलाग्र बदल झाले ते म्हणजे पंचायतराज व्यवस्थेला संवैधानिक दर्जा प्राप्त झाला. संविधानामध्ये अकरावे परिशिष्ट जोडून २९ विषयाची सूची दिली. ग्रामसभा पंचायतराजचा आधारभूत घटक, २० लाखांपेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या राज्यात त्रिस्तरीय संरचना, अनुसूचित जाती व जमातीसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण याच प्रवर्गाच्या महिलांना ३३ टक्के आरक्षण, इतर मागासवर्गीयांचे आरक्षण राज्य विधिमंडळावर सोपविले मात्र १/३ पेक्षा कमी नसेल इतके आरक्षण महिलांसाठी ठेवावे. पंचायतराज व्यवस्थेचा पाच वर्षाचा निश्चित कार्यकाल, राज्यशासनाच्या संचित निधीतून विकास अनुदानाची व्यवस्था, राज्य वित्त आयोगाची स्थापना इत्यादी तरतुदीमुळे पंचायतराज राजकीय व्यवस्थेत महत्वाचे स्थान मिळाले याही पुढे जाऊन महाराष्ट्र शासनाने २०११ मध्ये महिलांसाठीच्या आरक्षणात वाढ करून ३३ टक्क्याचे ५० टक्के केले. या निर्णयामुळे सर्व जाती धर्मातील महिला सत्तेच्या प्रक्रियेत समाविष्ट झाल्या आणि त्यामुळे नवीन नेतृत्व निर्मितीला गती मिळाली.

या ५० टक्के महिला आरक्षणाच्या निर्णयामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेत विशेषतः ग्रामपंचायत पातळीवर शोषित, वंचित समाजातील महिला सत्तेत मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या. महाराष्ट्र राज्यात सध्या २७६०९ ग्रामपंचायती आहेत. या निर्णयामुळे या ग्रामपंचायतीतील ५० टक्के म्हणजे १३८०४ महिला या सरपंच पदावर विराजमान आहेत. मराठवाड्याचा विचार केला असता मराठवाड्यात एकूण ६६४६ ग्रामपंचायती आहेत. त्यापैकी २२५७ महिला या सरपंच आहेत. प्रवर्गनिहाय महिला सरपंचाची संख्या पाहता मराठवाड्यात खुल्या प्रवर्गाच्या १७५६ महिला सरपंच आहेत, इतर मागास प्रवर्गाच्या ८७९, अनुसूचित जातीच्या ४७१ आणि अनुसूचित जमातीच्या १५१ महिला सरपंच पदावर विराजमान आहेत. या महिला सरपंचाची संख्या पाहता निश्चितच फार मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र पातळीवर महिलांचा सहभाग वाढलेला दिसून येतो.

## संदर्भसूची

१. वेबस्टर्स - न्यु ट्वेन्टीथ सेंचूरी डिक्शनरी ऑफ इंग्लिश लँग्वेज, इंडियन एडीशन, १९६०, पृ.क्र. ७१५.
२. पाटील व्ही.बी. - महाराष्ट्रातील पंचायतराज ,केसागर पब्लिकेशन,पुणे २००५. पृ.क्र.६४.
३. कित्ता - पृ.क्र. ३०५.